नि. फौ. ख. क्र.  ८४/२०२०
**सरकार विरुध्द सतीश डुमणे**
**निशाणी क्र.५६**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२**
मी शपथेवर निवेदन करते की,

नाव– **निर्मला अमृत डुमणे,**
वय–**३६** वर्षे, व्यवसाय–घरकाम,
रा.  **सायखेड ता.धर्माबाद जि. नांदेड.**

**सरकारी वकील श्री.ए.ए.शिखरे यांच्या मार्फत  साक्षीदाराचा शपथेवरील सरतपास सुरु.**

फिर्यादी माझा पती आहे. आरोपींना ओळखते. सर्व आरोपी आज न्यायालयात हजर आहेत. आरोपी माझ्या भावकीतील आहेत. माझे पती शेती करतात. सायखेड गावात गट क्र.८२ मध्ये माझ्या पतीची साडे तीन एकर शेत जमीन आहे. दिनांक ३१/०७/२०२० रोजी माझ्या पतीने आमच्या शेतात सकाळी ०९.०० ते १०.०० वाजण्याच्या सुमारास गाय बांधली व ते बाहेर गेले. जाताना ते मला म्हणाले दुपारी ०२.०० वाजता जाऊन गाईला पाणी पाज. दुपारी ०३.०० च्या दरम्यान मी गाईला पाणी पाजण्यासाठी शेतात गेले. त्यावेळी तेथे आरोपी सतीश डुमणे हा मला म्हणाला, ‘गाय या शेतात का बांधलीस, मी म्हणालो माझे शेत आहे. तो मला म्हणाला तुझे शेत कुठले आले, असे म्हणुन त्याने माझा हात धरुन ओढत शेतातुन बाहेर काढले.  त्यानंतर मी माझ्या घरी गेले. माझ्या घरी माझा पती आला होता. त्याला मी झालेली घटना सांगितली. मी व माझे पती विचारण्यासाठी आरोपीच्या घरी गेलो. आरोपीचे घर आमच्या शेताजवळ आहे. तेथे आम्ही गेलो. माझ्या  पतीने सतिश डुमणेला विचारले तु माझ्या पत्नीचा हात धरुन का मुरगाळला असे विचारले, त्याने काहीही न बोलता मारहाण करण्यास सुरुवात केली. त्याने माझ्या पतीच्या डाव्या कानाच्या वरती लाकडाने मारहाण केली. त्यामुळे माझ्या पतीला जखम होऊन रक्त निघाले. आरोपी क्र.२ ते ६ यांनी मला लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यांनी माझे केस धरुन ओढले, पोटावर मारले, उजव्या हाताच्या पंजावर मारले. तसेच आरोपींनी शेतात पुन्हा आला तर जिवे मारण्याची धमकी दिली, आई–बहिणीवरुन आणि

छिनाल, हलकट अशी शिवीगाळ केली.

०२. त्यानंतर मी व माझे पती धर्माबाद पोलीस स्टेशनला गेलो. पोलीसांनी आम्हाला सरकारी दवाखाणा धर्माबाद, येथे पाठवले. सरकारी दवाखाण्यात डॉक्टरांनी माझ्या पतीच्या डोक्यावर टाके घातले, मला औषध गोळया दिल्या.

०३. आता मला एक गैरीचे लाकुड दाखवले. याच लाकडाने आरोपी सतिशने माझ्या पतीच्या डाव्या कानाच्या वरती डोक्यात मारले होते. सदर लाकुड अर्टिकल–अ वर आहे.

**सरतपास–पुर्ण.**

**<u>आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. यु.बी.बिलोलीकर यांच्या मार्फत साक्षीदार क्र.२ चा उलटतपास सुरु</u>**

०४. माझा विवाह फिर्यादी सोबत सन २००६ साली झाला. मौजे सायखेड येथील गट क्र.८२ मधील जमीन कोणाच्या मालकीची आहे व ती कोणाच्या ताब्यात आहे, याबदल मला माहिती नाही. साक्षीदार पुन्हा सांगते, त्या जमीनीचा सातबारा माझ्या सासुच्या नावाने आहे. तपासादरम्यान माझे बयाण घेतेवेळी त्या जमीनीचा सातबारा उतारा पोलीसांना दिला नाही. साक्षीदार सांगते, तेवढी गरज पडली नाही म्हणुन उतारा दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील घटनेच्या अगोदर पासुन आमचा आरोपींसोबत शेतजमीनीवरुन वाद चालु आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.८२ बदलचा वाद धर्माबाद येथील उपविभागीय अधिकारी व बिलोली येथील वरिष्ठ न्यायालयात चालु आहे. हे म्हणणे खरे नाही की, गाय बांधलेले रान हे आरोपी सतिशच्या वडीलाच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, गाय बांधलेले रान पडीत होते. हे म्हणणे खरे नाही की, जमीनीचा वाद मिटावा व ती जमीन आपल्या ताब्यात मिळावी म्हणुन आम्ही त्या जमीनीत गाय बांधुन आरोपींविरुद्ध खोटी तक्रार केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सतिशने माझ्या हाताला धरुन कधीही ओढलेले नाही, गाईने ढकलुन दिल्यामुळे मी खाली पडले व माझ्या हाताला मार लागला.

०५. पोटावर मारले, छिनाल, हलकट अशी शिवीगाळ केली, असे मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितले होते. परंतु, तो मजकुर माझ्या बयाणात का नमुद नाही, हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.३ ते ६ या शिकलेल्या मुली आहेत व त्यांना नोकरी लागु नये म्हणुन मी त्यांच्याविरुद्ध पोलीसांकडे बयाण दिले आहे व माझ्या नव–याने त्यांच्याविरुद्ध खोटी तक्रार दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटनेच्या दिवशी मी व माझ्या पतीने आरोपींना मारहाण केली म्हणुन आरोपींनी आमच्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे व त्या केसची आज तारीख आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या केस मधुन सुटका करुन घेण्यासाठी मी आरोपींविरुद्ध खोटी केस दिली आहे.

०६. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने अर्टिकल–अ वरील लाकुड माझ्या पोलीस स्टेशनला नेऊन दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात न घडलेली खोटी घटना सांगितलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष दिली आहे.

**उलटतपास–पुर्ण**

**फेरतपास–नाही.**

दिनांक: १८.०६.२०२५

वाचुन दाखवले,
बरोबर असल्याचे कबुल केले.

SANJAY MARUTI KOLEKAR
Digitally signed by SANJAY MARUTI KOLEKAR
Date: 2025.06.18 16:37:12 +0530

(एस.एम.कोळेकर)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,धर्माबाद.

श्रवणोत्तर स्वीकृती,

SANJAY MARUTI KOLEKAR
Digitally signed by SANJAY MARUTI KOLEKAR
Date: 2025.06.18 16:37:08 +0530

(एस.एम.कोळेकर)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.